**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.**

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF /AZ /U / 130 / 2008 /51/**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Bajirao Tatyagi Pathak,
Pathak Niwas, Khadkeshwar,Aurangabad,
( Consumer No. 490010046677)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Bajirao Tatyagi Pathak, Pathak Niwas, Khadkeshwar,Aurangabad, ( Consumer No. 490010046677 )

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 23.09.2008 at 11.30 Hrs.**

**Encl As above**.

Member/Secretaty
CGRF,MSEDCL,Aurangabad

Copy to :
Shri Bajirao Tatyagi Pathak,
Pathak Niwas, Khadkeshwar,
Aurangabad,

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१३०/२००८/५१**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०९/०९/२००८**
**निकाल दिनांक ;- ०७/११/२००८**

**श्री बाजीरावजी तात्याजी पाठक,**
**पाठक निवास,खडकेश्वर,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१००४६६७७) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,)**
**औरंगाबाद. गैरअर्जदार**

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०९/०९/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २३/०९/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराचे काढण्यात आलेले मीटर हे त्यांच्या वडीलांच्या नावे असुन वडील मयत झात्यानंतर ते वीजेचा वापर करीत असल्यामुळे ते महावितरण कंपनीचे ग्राहक असल्याचे त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. महावितरण तर्फे त्यांच्याकडे बसविण्यात आलेले वीज मीटर हे दिनांक ०८/०२/२००४ रोजी कोणतीही पुर्व सुचना न देता काढुन घेतले याबात त्यांनी संबंधीत विभागाकडे विचारणा केली असता त्यांच्या नांवे ५१४०/- रूपये थकबाकी असल्याचे व ही रक्कम भरल्यानंतरच वीज पुरवठा पुर्नजोडणी करण्यात येईल असे त्यांना सांगण्यात आले. अर्जदाराने दिनांक ०२/०४/२००४ रोजी महावितरणच्या मुख्य अभियंता यांना पत्राव्दारे त्यांना सरासरीवर आधारीत देण्यात आलेले वीज बिल रद्द करण्याची विनंती केला पण या प्रत्राची कोणतीही दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन त्यांना सुधारीत वीज बिल देवुन वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक २३/०९/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री पाठक उपस्थित होते महावितरण कंपनीर्फे नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. त्यांनी दाखल केलेल्या जवाबानुसार अर्जदाराचा वीज पुरवठा हा त्यांच्याकडील थकबाकीमुळे कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला असुन व सध्या राबविण्यात येत असलेली नवप्रकाश योजना ही अर्जदाराचा प्रकरणात आंमलात आणता येत नसल्याचे म्हटले आहे. अर्जदाराने सुनावणीच्या वेळी त्यांनी अनेक वेळा मागणी केल्यानंतर देखील त्यांना सुधारीत वीज बिल देण्यात आले नसल्याचे म्हटले आहे, व त्यांना वीज बिल दिल्यास ते भरण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे. त्याचप्रमाणे त्यांचे वीज पुरवठा ह्या चुकीच्या वीज बिलापोटी कोणतीही पुर्वसुचना न देता खंडीत करण्यात आल्याचे म्हटले आहे. महावितरण तर्फे अर्जदारास देण्यात आलेले वीज बिल हे क्रेडीट बिल असल्याचे आढळुन आल्यामुळे अर्जदाराचा खंडित केलेला वीज

पुरवठा हा २४ तासात पुर्नजोडणी करून देण्याचा आदेश मंचाने महावितरण कंपनीस दिला व नोडल अधिकारी यांना या प्रकरणाची संबंधीत कागदपत्रे पुढील सुनावणीच्या वेळेस सादर करण्याचे सांगितले व या प्रकरणाची पुढील सुनावणी ३०/०९/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ३०/०९/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी मंचाने दिनांक २३/०९/२००८ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे अर्जदाराचा वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्यात आल्याचे सांगितले. त्याप्रमाणे या प्रकरणाची संबंधीत कागदपत्रे मंचात दाखल केली. अर्जदार यांनी पुढील वीज बिल देतांना त्यांनी भरलेल्या २४००/- रूपयाची नोंद घेण्याची तसेच व्याज व दंड न आकारण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकाली ठेवले.

४) अर्जदार व महावितरण कंपनी तर्फे नोडल अधिकारी यांनी दाखल कलेल्या कागदपत्रावरून मंचास असे आढळुन येते की, सदरील मीटर लावण्यात आलेल्याजागी वीज वापर नसल्यामुळे मागिल रिडींग ४११२ व चालु ४११२ असे दर्शवीत महावितरण कंपनीने जुन २००६ ते डिंसेबर २००६ या काळात शुन्य वीज वापराची वीज बिलाची आकारणी केली असल्याचे दिसुन येते सी.पी.एल.वर मीटर स्टेटस कधी नार्मल तर कधी फॉल्टी अशी नोंद घेण्यात आलेली दिसुन येते. जुन २००७ ते मार्च २००७ या काळात वरील प्रमाणे मीटर रिडींग दाखवित सरासरी वर आधारीत ३०० युनिटची वीज बिल आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येते. दिनांक १५/०२/२००८ रोजी महावितरणच्या कनिष्ठ अभियंता यांनी अर्जदाराच्या मीटर ची स्थळ पाहणी केली. या स्थळपाहणी अहवालात मीटरवरील रिडींग ही ४११२ अशी असल्याचे दिसुन येते. यावरून जुन २००७ ते नंतर ही अर्जदारचा वीज वापर शुन्य असल्याचे दिसते. त्यामुळे जुन २००७ ते मार्च २००७ या काळात सरासरीवर आधारीत ३०० युनिट वापराची आकारणी ही चुकीची असल्याचे मंचाचे मत आहे.

महावितरण कंपनीने दिनांक २०/०८/२००८ रोजी अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलावर ही क्रेडीट बिल असल्याचे दिसुन येते.१७२६/-रूपये रक्कम महावितरण कंपनीकडे अतिरिक्त जमा असल्याचे आढळुन येते. यावरून अर्जदाराचा वीज पुरवठा कायम स्वरूपी बंद करण्याची महावितरणने केलेली कार्यवाही ही चुकीची व बेजवाबदार पणाची असल्याचे मंचाचे मत आहे. वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास जानेवारी २००६ ते डिंसेबर २००६ पर्यत केलेली वीज बिल आकरणी योग्य असुन जानेवारी २००७ ते पुढील सर्व काळातील वीज बिलाची आकारणी चुकीची असल्यामुळे ती रद्द करण्यात येत आहेत.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास जानेवारी २००७ ते ऑगष्ट२००८या काळाचे सुधारीत वीज बिल द्यावे व कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येऊ नये.

३) अर्जदाराने या काळात भरलेली रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलात करण्यात यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| हेमंत अ. कापडिया | आ. नि. सोनवणे | विष्णु अं. हंबिरे |
|---|---|---|
| सदस्य | सदस्य/सचिव | अध्यक्ष |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१३०/२००८/५१** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री बाजीरावजी तात्याजी पाठक,**
**पाठक निवास,खडकेश्वर,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१००४६६७७)**

(तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१३०/२००८/५१ )

आपण दिनांक ०९/०९/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**